एकात्मिक बालविकास सेवा योजना-खालापूर

**अंगणवाडी सेविका / मदतनीस या पदांची भरती**

# जाहिरात

महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग मुंबई यांजकडील शासन निर्णय क्र.एबावि/२००७/प्र.क्र.२६/का-६ दिनांक ५ ऑगस्ट २०१० व शासन निर्णय क्र.एबावि/२००९/प्र.क्र.७८/का-६ दिनांक १५ सप्टेंबर २०११ नुसार एकात्मिक बालविकास सेवा योजना-प्रकल्प खालापूर अंतर्गत खालील अंगणवाडी केंद्रांवर अंगणवाडी सेविका / मदतनीस या मानधनी सेवेची पदे भरण्यासाठी दिनांक **१२/०३/२०१३** पर्यंत कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत) इच्छुक महिला उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

❖ **अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे असलेली अंगणवाडी केंद्रांची नांवे :-**

१) नडोदे, २) निगडोली, ३) आळे आंबिवली, ४) उंबरविरा, ५) बुरुजवाडी.

❖ **अंगणवाडी मदतनीस यांची रिक्त पदे असलेली अंगणवाडी केंद्रांची नांवे :-**

१) वासांबे नं.१, २) पानशिल, ३) बुरुजवाडी, ४) ताडवाडी, ५) खरसुंडी, ६) ढेकू, ७)साकूचीवाडी,
८) टेंभरी, ९) कांढरोली, १०) बोरीवली,

**अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी अटी व शर्ती :-**

१) **शैक्षणिक पात्रता :-**

अ)**अंगणवाडी सेविका** पदासाठी किमान **इ.१० वी पास** असणे आवश्यक.

ब)**अंगणवाडी मदतनीस** पदासाठी किमान **इ.७ वी पास** असणे आवश्यक,

(शैक्षणिक पात्रतेसाठी द्यावयाचे गुण १५/११/२०११ च्या शासन निर्णयाच्या सुधारित परिशिष्ट अ भाग-१ प्रमाणे देण्यात येतील.त्यासाठी गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.)

२) **वयाची अट :-** अर्जदाराचे वय २१ ते ३५ वर्ष या दरम्यान असावे
(दि. १२ मार्च२०१३ रोजी पुर्ण वय २१ ते ३५ वर्षे),

३) **लहान कुटुंब :- अ)** लहान कुटुंब याचा अर्थ दोन मुले व पती-पत्नी,

**ब)** मानधनी पदासाठी अर्ज करतांना दोनपेक्षा जास्त अपत्य होऊ देणार नाही असे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र परिशिष्ट **ब** लिहून द्यावे लागेल,

**क)** सदर नियम अमलात आलेल्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मुल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसुतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य समजण्यात येईल.अपत्यांमध्ये दत्तक मुलांचा समावेश ग्राह्य नाही.

४) **स्थानिक रहिवासी :-** ग्राम पंचायत क्षेत्रातील महिला असावी. याबाबत ग्रामपंचायतीचा दाखला जोडावा.

५) **विधवा व अनाथ मुली :-** स्थानिक अनाथ मुलींनी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचा अनाथ असलेबाबतचा तसेच स्थानिक विधवा यांनी संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी (BDO) यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडावे.

(**टिप**- विधवा महिला व अनाथ मुलींना **७** अतिरिक्त गुण देण्यात येतील)

**६)** एका केंद्रातील पदासाठी अर्जदारांची संख्या ३ पेक्षा जास्त असल्यास अधिक गुणांक असलेले (Merit List) **वरचे फक्त ३ (Top Three)** उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

**७)** मागासवर्गीय उमेदवार असल्यास (अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती) त्यांना **१०** अतिरिक्त गुण देण्यात येतील. तसेच इतर मागासवर्गीय उमेदवारांना **३** अतिरिक्त गुण देण्यात येतील.

**अर्जासोबत सादर करावयाची साक्षांकीत (Atested) कागदपत्रे:-**

१)शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत, २) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र (टक्केवारीनुसार गुण असल्याची /असल्याच्या गुणपत्रिका आवश्यक), ३) स्थानिक रहीवासी असलेबाबत ग्रामपंचातीचे सरपंच व ग्रामसेवक यांचे स्वाक्षरी असल्याचा दाखला, ४) विधवा किंवा अनाथ असल्याबाबतचा दाखला, ५)अर्जदार मागासवर्गीय असल्यास योग्य त्या प्राधिकरणाचा दाखला, ६) अर्जदार विवाहित असल्यास विवाहापुर्वीचे व विवाहानंतरचे नांव असलेली व्यक्ती ही अर्जदारच आहे असा सरपंच यांचा दाखला आवश्यक.

**टिप:-** १) यापुर्वी या कार्यालयाकडे केलेल्या जुन्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. नव्याने अर्ज सादर करावे.

२) सेवाभरतीच्या नियमात शासनाकडून बदल झाल्यास सदर नियम अर्जदारास बंधनकारक राहतील.

३) अपुर्ण व निकषात न बसणारे अर्ज रद्द करण्यात येवून या स्तरावर निकाली काढण्यात येतील. याबाबत अर्जदारास लेखी कळविण्यात येणार नाही.

४) पात्र महिला उमेदवारांनी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे ही साक्षांकीत करुन **बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना(ICDS),सोमेश्वर सोसायटी, रायगड बाजारजवळ,खालापूर, ता.खालापूर,जि.रायगड** या ठिकाणी कार्यालयीन सुट्या वगळून अंतिम दिनांक **१२/३/२०१३ या दिनांकापर्यंत सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत** सादर करावेत.

अर्जाचा विहीत नमुना संबंधित ग्रामपंचायत व या कार्यालयात सुटीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन ठेवण्यात आले आहेत.

**बालविकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बालविकास सेवा योजना**
**खालापूर,जि.रायगड.**
**दुरध्वनी क्रमाक ०२१९२- २७५३९१.**

<u>अंगणवाडी सेविका,मिनी अंगणवाडी सेविका,मदतनीस पदासाठी</u>

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| **उमेदवाराचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवावा** |

प्रती,

**मा.बालविकास प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक बालविकास सेवा योजना,**
**खालापूर,जि.रायगड.**

पदाचे नांव :- ------------------------------------ अंगणवाडी केंद्राचे नांव :- -------------------------------

१) **अ**.उमेदवाराचे पूर्ण नांव :- ------------------------------------------------------------------------------------------

**ब**.वडीलांचे /पतीचे पूर्ण नांवः- ---------------------------------------------------------------------------------------

**क**.विवाहापुर्वीचे संपुर्ण नांवः- ----------------------------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ---------------------------------------------------------------------------------------------------

पोस्ट ------------------------ तालुका--------------------- जिल्हा-------------------

फोन नंबर-------------------------- मोबाईल नंबर-------------------------------

३) सामाजिक प्रवर्ग :- ---------------------------- जात, ---------------------------- पोटजात.

४) जन्मतारीख :- **अ)** दिनांक ------------ महिना----------------- वर्षे---------------------

**ब)** अर्जदाराचे वय ------------------- वर्षे --------------- महिने

**(**दि. १२ मार्च २०१३ रोजी पुर्ण वय २१ ते ३५ वर्षे असावे.**)**

५) अर्जदाराचा शैक्षणिक पात्रतेचा तपशिलः-

| **अ.नं.** | **शैक्षणिक अर्हता** | **शाळा/परिक्षामंडळ/विद्यापीठाचे नांव** | **गुणपत्रिकेनुसार टक्केवारी** | **उत्तीर्ण वर्ष** |
|---|---|---|---|---|
| १ | सातवी पास | | | |
| २ | दहावी पास | | | |
| ३ | बारावी पास | | | |
| ४ | पदवीधर पास | | | |
| ५ | बारावीनंतर D.Ed. असल्यास | | | |

६) **अनुभव :-** शासकीय अंगणवाडीचा आहे/नाही.
असल्यास किती वर्षाचा कालावधी?

७) विधवा किवा अनाथ आहे का ? होय/नाही.

८) सध्या असलेल्या अपत्यांची संख्या :- ----------

---

मी असे प्रमाणित करते की, बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, खालापूर यांच्या कार्यालयाची जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असून सदर पदासाठी नमुद केलेल्या अटी व शर्तीची मी पुर्तता करते. याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल व परिणामी मिळालेले पद गमावण्यास मी बांधील राहील याची मला जाणीव आहे.

**दिनांक :-** **अर्जदाराची सही**

## परिशिष्ट "ब"

## लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र

मी, (अर्जदाराचे नांव)श्रीमती. ------------------------------------------------------------------------------------------------
--------- श्री./श्रीमती ------------------------------------------------------------------------- यांची मुलगी/पत्नी, वय ----------- वर्षे, राहणार------------------------------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

(१) मी -------------------------------------------(पदाचे नांव) या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

(२) आज रोजी मला खालीलप्रमाणे मुले आहेत.

| अ.नं. | मुलाचे/मुलीचे नांव | त्यांची जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी अनर्ह (अपात्र) ठरविण्यास किंवा कमी करण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

(४) मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण :-

दिनांक :-                                                   अर्जदाराचे नांव व सही